# मुंबई विद्यापीठ

केंद्रिय मुल्यांक कक्ष, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व),
मुंबई ४०० ०९८

क्र. DBOEE/आय.सी.एफ./२०१८-१९/४७७ दिनांक - २६ फेब्रुवारी, २०१९

## परीपत्रक

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, यांना कळविण्यात येते की, **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम (८९)** अन्वये विद्यापीठाने, त्याने घेतलेल्या प्रत्येक परीक्षेचा निकाल त्या विशिष्ट पाठयक्रमाच्या परीक्षेच्या अखेरच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आता जाहिर करण्याचा आटोकाट प्रयत्न करील आणि तो कोणत्याही परिस्थितीत त्या अखेरच्या दिनांकापासून उशिरात उशिरा म्हणजे पंचेचाळीस दिवसांच्या आत घोषित करणे विद्यापीठास बंधनकारक आहे. तसेच **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४८ (४)** विद्यापीठ संलग्न/संचलित महाविद्यालये, समुह महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या प्रत्येक अध्यापकाला व अध्यापकेतर कर्मचा-याला, विद्यापीठाच्या परीक्षा व विद्यार्थ्यांचे मुल्यमापन यांबाबत परिनियमाद्वारे विहित केल्याप्रमाणे आवश्यक ते सहाय्य आणि सेवा देणे बंधनकारक आहे. या अनुषंगाने सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना विनंती करण्यात येते की, उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन करण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना ऑनलाईन मुल्यांकन प्रणालीत (OSM) टॅग करणे आवश्यक आहे, त्यासाठी सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना ऑनलाईन मुल्यांकन (OSM) प्रणालीत शिक्षकांना टॅग करणेसाठी लॉगिन व पासवर्ड उलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर लॉगिन व पासवर्डद्वारे सर्व प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षकांना त्यांच्या विषयाच्या उत्तरपुस्तिकेस टॅग करणे गरजेचे आहे.

प्रत्येक महाविद्यालयाने ऑनलाईन मुल्यांकन प्रणालीद्वारे (OSM) मुल्यांकन करणेसाठी मुल्यांकन केद्र (CAP Center) स्थापित करणे बंधनकारक आहे.

उपरोक्त बाबतीत सर्व महाविद्यालयांना असे सुचित करण्यात येते की, त्यांच्या महाविद्यालयातील पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमासाठी नोंदणी असलेल्या विद्यार्थ्यां संख्येच्या कमीत कमी दीडपट मुल्यांकन ( उदा. १०० नोंदणीकृत विद्यार्थी संख्येच्या १.५ पट गुणीले एकूण विषय म्हणजे १०० X १.५ X ६ = ९०० ) करणे आवश्यक आहे.

महाविद्यालयाने प्रत्येक परीक्षेसाठी तपासलेल्या उत्तरपुस्तिका व प्राध्यापकांची संख्या याबाबत उपकुलसचिव, केंद्रिय मुल्यांकन कक्ष, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ यांचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. सदरचे प्रमाणपत्र हे संलग्नता (Affiliation), नियमितता (Continuation), नैसर्गिक वाढ (Natural Growth), प्रवेश क्षमता (Intake Capacity), पदव्युत्तर केद / संशोधन केंद्र (PG Center / Research Center) इ. बाबत विद्यापीठास प्रस्ताव सदर करतांना आवश्यक राहिल यांची सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

याबाबत सर्व महाविद्यालयांना विनंती करण्यात येत की, वरील सर्व बाबींची पुर्तता करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

डॉ. विनोद प्र. पाटिल
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत —

१. विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक.

प्रत महितीसाठी व योग्य त्या कार्यवाहिसाठी—

१. सर्व उपकुलसचिव / सहा. कुलसचिव, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ
२. सर्व उपकुलसचिव, / सहा. कुलसचिव, फोर्ट परीसर, मुंबई विद्यापीठ
३. स्वीय सहाय्यक i) कुलगुरु ii) प्र—कुलगुरु iii) कुलसचिव